जग बदल घालुनी घाव ।

सांगून गेले मला भीमराव ।।



लौकशाहीर

अण्णा भाऊ साठे

# स्पंदन

अर्धवार्षिक अंक जानेवारी २०२०

मराठी भाषा व वाङ्मय मंडळ

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

## श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण

मु. पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

#  स्पंदन 

## अर्धवार्षिक अंक जानेवारी २०२०

लेखनीचं बळ देऊया, थरथरणा-या हातांना
हत्तीचं बळ देऊया, लडबडणा-या पायांना
हक्काचं व्यासपीठ देऊया, सळसळत्या तरुणाईला
'स्पंदन' मधून टिपूया त्यांच्या वाङ्मयीन स्पंदनांना !

### संपादक मंडळ

**अध्यक्ष:- प्राचार्य डॉ.के.एम. कोतवाल** **संपादक:- प्रा.डॉ. विकास पाटील**

**सदस्य:- प्रा. डॉ. बळवंत दाभाडे**

### विद्यार्थी प्रतिनिधी

| | | |
|---|---|---|
| प्रथमेश आंबेरकर | आदित्य माळी | प्रसन्न कलमस्टे |
| कु.शितल दबडे | कु.सायली म्हादये | नितेश मासये |
| कु.यशश्री शेटचे | कु.सायली गांगण | अनिकेत बावकर |
| लाभेश गोमणे | कु. मयुरी रावणक | कु. गौरी ठाकूरदेसाई |
| कु. मयुरी कोलते | प्रसाद नारकर | |

# संपादकीय...

यावर्षीचा पावसाळा मानसाला बरंच काही शिकवून गेला. एक नवी महापूराची रेषा आखून गेला. महापूरात मानसातलं सारं अंतर तो आपल्यासोबत घेऊन गेला. मानसाने निर्माण केलेल्या सोयी सुविधांचा त्यांने पुरता समाचार घेतला. ज्या विज्ञानाच्या बळावर आपण प्रगतीच्या गप्पा मारुन निसर्गाला आणि पर्यावरणाला हानी पोहचवत होतो त्याचा बदला घेऊन गेला. या संकटात मानवातील जातीधर्माच्या, जातीपातीच्या, उच्चनिच्चतेच्या साऱ्या भिंती गळून पडल्या. सर्वात श्रेष्ठ मानवधर्म आणि संकटात मदत करणे हेच श्रेष्ठ कर्म हा नवा सिद्धांत या काळात निर्माण झाला. या संकटात स्वत:चा जीव धोक्यात घालून दुसऱ्यांचे जीव वाचवणारा तो देवदूत व तोच खरा देव याची प्रचिती आली. बेसुमार वित्तहानी झाली. मानव सरकारच्या मदतीकडे डोळे लावून बसला. त्यातच विधानसभेच्या निवडणूका आल्या. सगळ्याच पक्षांनी आपल्या घोषणांची पोती जनतेसमोर रिकामी केली. सरकारच्या मदतीकडे आशा लावून बसलेल्या जनतेला महापूराबरोबरच परतीच्या पावसानेही मोठा फटका दिला.

महापूर अवकाळीनं सारं काही नेलं

मायबाप सरकार तुम्ही कधी होणार जागं ?

असा प्रश्न शेतकरी वर्गाला पडला. निवडणूकांचा निकालही पावसासारखाच धक्कादायक लागला. संख्याबळाच्या बळावर होऊ लागले रोज नवे नवे दावे, त्यातूनच वाढले पक्षापक्षातील हेवेदावे. मुख्यमंत्र्यांची खुर्ची दिसू लागली प्रत्येकाच्या डोळ्यात, आसवे आटू लागली आता शेतकऱ्याच्या डोळ्यात. सरकार स्थापनेसाठी सुरु झाला संख्याबळाचा खेळ, शेतकऱ्याचा विस्कटू लागला जगण्यातला मेळ.हो-नाही म्हणता

म्हणता सरकार एकदा स्थापना झाले, शेतकऱ्यांचे प्रश्न मात्र पूर्वीसारखेच भिजत राहिले.

या साऱ्यानेच अस्वस्थ होतो आहे आजचा युवक. तो होतो आहे अधिक सजग. अशाच अस्वस्थपणात त्याच्याकडून टिपले जातात.वास्तवाचे क्षण. त्या क्षणांचेच मग बनतात धगधगते शब्द. त्या शब्दांना कवेत घेते आमचे `स्पंदन' आणि व्यक्त होते कवी लेखकाच्या काळजातले रुदन.

`स्पंदन'चा  हा १७ वा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. तरुणाईला हक्काचं व्यासपीठ देऊन तरुणाईला अधिकाधिक लिहीतं करण्याचा आमचा प्रयत्न सफल होताना दिसत आहे. आमच्या नवलेखक, कवींचे शब्द आज अधिकाधिक धारधार बनताहेत. त्यांच्या शब्दांना प्रकट करण्यासाठी धडधडतं आहे आमच `स्पंदन'! त्यांच्या शब्दांना वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी धडपडतं आहे `स्पंदन'. नवलेखक कवींच्या भावना प्रकटीकरणाचा हा आमचा अल्पसा प्रयत्न म्हणजे `स्पंदन'!

***प्रा. विकास पाटील***
**मराठी विभाग**

---

## ऋणनिर्देश

या अंकास पूर्ण रुप देण्यासाठी ज्यांनी सहकार्य केले असे महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सहलेखक विद्यार्थी यांचे आभार!

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे

**नितेश मासये**
प्रथम वर्ष कला

मराठी साहित्यविश्वात स्वत:च्या लेखनाने, निर्भिड विचाराने आणि आपल्या असामान्य प्रतिभेने स्वतंत्र्य अस्तित्व निर्माण करणारे अण्णाभाऊंचे  व्यक्तिमत्व खूपच वेगळ्या उंचीचे होते. स्वत:च्या दारिद्र्याची त्यांनी कधी लाज वाटू दिली नाही व कमी शिकल्याची कधी खंत बाळगली नाही. शाळेच्या चार भिंतीत दिडदिवस घालवलेल्या या अवलियाने रशियाचा प्रवास केला. विद्यापीठाची पायरी कधीही न चढलेल्या या लेखकाच्या साहित्यावर मात्र अनेक विद्यापीठात शेकडो विद्यार्थ्यांनी पीएच.डी केली. या निरक्षर माणसाच्या साहित्याचा अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश झाला.

अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांचे वडील भाऊ साठे तर आई वालूबाई साठे. एक लहान भाऊ, दोन बहिणी व आई वडील असे त्यांचे कुटुंब. गावकीची कामे करूनही पोटभर अन्न मिळत नाही म्हणून त्यांचे कुटुंब मुंबईला आले. मुंबईत त्यांनी झोपडीत राहून हमाली, कोळसा वाहणे, खाणकाम, गिरणी कामगार अशी मिळतील ती कामे केलीत.

कोणतेही विद्यापीठीय शिक्षण न घेता वा शालेय शिक्षणही पुरे न करता अण्णाभाऊंनी केलेली वाङ्मयनिर्मितीमात्र आपणा सर्वांनाच अचंबित करणारी आहे. ३० कादंबऱ्या, २२ कथा संग्रह, १४ लोकनाट्ये, १० पोवाडे, १३ गीत पुस्तिका, एक नाटक, एक प्रवास वर्णन, १२ चित्रपट कथा असा कितीतरी मोठा साहित्य संभार अण्णाभाऊंनी निर्माण केला. त्यांच्या ‘फकिरा’ कादंबरीला महाराष्ट्र राज्य सरकारचे कादंबरी लेखनातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यांचे साहित्य जगातील व भारतातील अशा सत्तावीस भाषांमधून भाषांतरीत झाले. त्यामुळे अण्णाभाऊ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावले.

अण्णाभाऊंच्या ‘फकिरा’ कादंबरीच्या ३५ आवृत्त्या निघाल्या. ‘वारणेचा वाघ’ ही कादंबरी लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचली. ‘चित्रा’ ही कादंबरी कन्नड, रशियन भाषेत भाषांतरीत झाली. ‘वारणेचा वाघ’ ही कादंबरी गुजराथी भाषेत प्रचंड लोकप्रिय झाली. वि.स. खांडेकरांनंतर परभाषेत भाषांतरित होणारे मराठीतील साहित्यिक म्हणजे अण्णा भाऊ साठे हे होत. त्यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील काम मोठे आहे. त्यांच्या कथा वाङ्मयातील पात्रांविषयी आचार्य अत्रे म्हणतात, "ती कच खाणारी, हार मानणारी माणसे नाहीत. वार झेलायला त्यांची छाती नेहमीच ताठ्याने  उभारलेली आहे. धडक द्यायला मस्तक नेहमीच पुढे झुगारलेले आहे. त्यांच्या कथांमध्ये इथून तिथून एकच झुंजार मराठबाणा आवेशाने स्फूरताना दिसून येतो. अण्णा भाऊंच्या कथेतल्या माणसांचा पिंड हा असा कणखर आणि टणक आहे." अत्रेंच्या या निवेदनातून साठेंच्या कथेतील व्यक्तिरेखा किती प्रभावी होत्या हे समजते.

अण्णा भाऊंनी आपल्या भोवतालचा समाज, माणसं आपल्या साहित्यातून अजरामर केलीत. अशा या श्रेष्ठ साहित्य सम्राटाचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या कार्याला माझा सलाम !

# लोकशाहीची स्थिती

**प्रथमेश आंबेरकर**
द्वितीय वर्ष वाणिज्य

''स्वतंत्र्य भारत चालावा योग्य मार्गावर
म्हणून ती लोकशाही वाहिली,
सर्वसामावेशक लोकशाही मात्र
सामान्य माणसापर्यंतच राहिली''

दीडशे वर्ष आपल्या भारतावर इंग्रजांनी राज्य केले. मग याच पारतंत्र्याच्या बंधनाला झुगारुन आपल्या क्रांतीविरांनी आणि नेत्यांनी स्वातंत्र्याची नांदी वाजवली. मग हा निर्माण झालेला स्वतंत्र्य भारत योग्य मार्गावर चालावा यासाठी एका महामानवाने सत्यता, समता आणि बंधुता या मार्गावर चालणारी लोकशाही आपल्याला दिली.

पण ज्या बलाढ्य लोकशाहीचे झेंडे आपण अटकेपार लावतो ती लोकशाही आता भारतात आहे का? असा प्रश्न जेव्हा मनासमोर उभा राहतो तेव्हा मनाची व्दिधा परिस्थिती निर्माण होते. कारण असे म्हणावे तर २०१९ चे फसवे आणि अविस्मरणीय राजकारण डोळ्यासमोर येते आणि नाही असे म्हणावे तर मोठ्या लोकांवर होणारे खटले, नाणार सारख्या प्रकल्पावर आजमावलेले लोकांचे मत, निर्भया सारख्या प्रकरणावर केलेले कष्ट हे चटकन डोळ्यासमोर येतात. मग काही काळासाठी वाटतं की ही लोकशाही आहे पण फक्त सामान्य माणसांसाठीच आणि मग भरडून निघतो त्याच्यात तोच सामान्य माणूस !

थोर शास्त्रज्ञ अब्राहम लिंकन यांनी '' लोकांनी लोकांसाठीच चालवलेले लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही होय '' अशी व्याख्या केली. पण त्या व्याख्येला आणि संकल्पनेलासुद्धा त्या सध्याच्या राजकारण्यांनी आपल्या सोयीनुसार बदलले आहे. त्याचे नवीनच स्वरुप आपल्यासमोर आणून ठेवले आणि ते म्हणजे असे की '' राजकारण्यांनी स्वत:चेच खिसे भरण्यासाठी स्वत:चेच चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय '' आत्ताचे राजकारणी हे विसरुन जातात.पण यामध्ये त्यांना हक्काचा विसर मात्र कधीच पडत नाही. लोककल्याणासाठी आपली निवड झालेली असते पण ते लोककल्याण साध्य करताना सुद्धा त्यामधून स्वकल्याण कसं साध्य करता येईल याकडे त्यांचा कटाक्ष असतो. त्यातूनच भ्रष्टाचारासारख्या मोठ्या अशा प्रलयाची निर्मिती होते आणि मग त्या लोकशाहीला तेथेच तडा जातो.

आता जर या लोकशाहीला वाचवायचं असेल तर एका अशा तेजस्वी तरुणाची निर्मिती व्हायला पाहिजे. ज्यात गर्वाचा लवलेशही नसेल, ज्याला भष्ट्राचाराची जाणीव ही नसेल, जो ज्ञानी असेल, गुणी असेल आणि जो लोककल्याणाला प्रथम प्राधान्य देईल असा तरुण जेव्हा निर्माण होईल ना, तेव्हा पुन्हा एकदा आपण गर्वाने सांगू शकतो की होय आमच्या स्वतंत्र्य भारतात बलाढ्य लोकशाही आहे!

# कोकण रेल्वे व कोकणच्या व्यथा

**प्रसन्न कलमस्टे**
प्रथम वर्ष कला

मा. मधु दंडवते व जॉर्ज फर्नांडिस यांच्या अथक प्रयत्नांतून साकार झालेली 'कोकणची जीवनवाहिनी ' म्हणजेच कोकण रेल्वे. दरम्यानच्या काळात जेव्हा ही संकल्पना मांडली गेली तेव्हा हे स्वप्न निव्वळ स्वप्नच भासत होते. मात्र कोकण रेल्वेच्या अभियंत्यांनी रात्रीचा दिवस करुन असंख्य नदीनाले, उंचच्या उंच डोंगरदऱ्या व असमान भूभाग यामुळे अशक्यप्राय वाटणारा हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वास नेला. कोकणला सुगीचे दिवस आले.

जगासमोर आदर्श म्हणून उदयास आलेल्या या प्रकल्पाला पाहून जगाने तोंडात बोटे घातली. मुसळधार पाऊस, असंख्य बोगदे, उंच खोल डोंगरदऱ्या, सततचे भुस्सखलन यांवर सातत्यपूर्ण मात करुन आपली कोकणरेल्वे सतत सेवेला हजर असते. मात्र या रेल्वेरुपी परिसाच्या मदतीने कोकणी जनतेला आपले जीवन सुवर्णमय करुन घेता आलेले नाही. रेल्वेला व्यवसायाचे साधन म्हणून कोणीही पाहिलेले दिसून येत नाही. अस्सल कोकणी उत्पादनांच्या विक्रीसाठी रेल्वेचे भले मोठे दालन खुले असतानाही तिच्याकडे दुर्लक्ष होणे ही मोठी खेदाची बाब आहे. या युवावर्गाला कमाईचे साधन म्हणून कोकण रेल्वे नजरेत आली तर रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

एकीकडे रेल्वेला कमाईचे साधन म्हणून पाहण्याची दृष्टी आपल्याला लाभत नाही तर दुसरीकडे रेल्वे प्रशासन कोकणाची बोळवण करतेय. या प्रकल्पाअगोदर कोकण आणि मुंबई यांच्यामध्ये महत्वपूर्ण जलमार्ग हा मोठा पर्याय होता. मात्र फार कमी चाकरमानी गावाला यायचे. कोकण रेल्वेच्या रुपाने चमत्कारच झाला व खवळत्या समुद्रामुळे आपल्या गणराया व बहिणींपासून दूर असलेले हजारो बांधव रेल्वेशी गाठ बांधून गावी परतायला लागले. तो पायंडा आजतागायत मोडलेला नाही. रक्षाबंधन, गणपती, दसरा, दिवाळी व शिमग्याला कोकण रेल्वे ठासूनच भरलेली असते. नाममात्र जादा गाड्या सोडलेल्या असल्या तरी आपले बांधव खच्चून भरलेल्या रेल्वे गाडीतून अक्षरश: नरक यातना भोगून परततलेले असतात.असे असताना दुसरीकडे खाजगी आरामबसमधून यावे तर ते शेकडो रुपयांना नाडताना दिसतात. त्यामुळे कोकण रेल्वे येऊनही कोकणकरांचे हाल कमी झालेले दिसत नाहीत.

कोकण रेल्वे मार्गावरुन कोकणकऱ्यांसाठी सोडलेली गाडी नियोजित वेळेपेक्षा २ ते ३ तर सिझनला ४ ते ५ तास लेट धावणे हा जणू तिचा अलिखित नियमच बनला आहे. दक्षिण - उत्तरेकडे धावणाऱ्या गाड्यांसाठी आमच्या गाड्या एका फेरीमागे २ ते ३ क्रॉसिंगसाठी उभ्या करणे व वेग कमी करणे ही बाब नित्याचीच बनली आहे. तसेच कोकणात थांबा असलेल्या गाड्यांत कोकणकरी कमी व परप्रांतीयच जास्त दिसतात. या गाड्या जनावरांना कोंबलेल्या गोठ्यासारख्या दिसायला लागतात. या गाड्या गोव्यातून पुढे प्रत्येक स्टेशन घेत वेळेवर धावतात. एवढा सर्व अन्याय कोकणची जनता सहन करतेय व आपले प्रतिनिधी याबाबत साधा ब्र ही काढत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांचे हाल कोण कमी करणार हाच मोठा यक्षप्रश्न आहे. म्हणूनच नुसत्या नावानेच भुरळ पाडणाऱ्या या कोकणरेल्वेला हा जाब नक्की विचारावासा वाटतो की बाई तू नक्की कोकणचीच आहेस ना?

# स्त्रीयांवरील अत्याचारांचा डोंब

**आदित्य माळी**
द्वितीय वर्ष वाणिज्य

प्राचीन काळातील स्त्री आणि आधुनिक काळातील स्त्री हा फरक फक्त काळानुसार बदलला किंबहुना फक्त काळच बदलला कारण स्त्री मात्र अजूनही त्याच अत्याचारांच्या वेढ्यात अडकलेली दिसते प्राचीन काळातील लाजरवाणी, भितीने ग्रासलेली एक स्त्री आणि आधुनिक काळातील निर्भिडपणे वावरणारी स्त्री फरक एवढाच पण अत्याचारांच्या संख्येचा स्तंभ मात्र वाढतच आहे . काळ बदलला आणि त्यानुसार स्त्री बदलली पण तिने फक्त आपल्या राहणीमानातच बदल केला. त्याऐवजी तिच्या वैचारिक स्थितीत बदल झाला असता तर तिने सध्याची परिस्थिती बदलली असती. कारण एक स्त्री आई, बहिण, काकी, बायको, वहिनी, आजी, अशा अनेक रुपात भेटते. तिच्या प्रत्येक रुपातून जेवढ्या चांगल्या विचारांची पेरणी झाली असती ना तेवढा एक चांगला पुरुष निर्माण झाला असता. जो स्त्रीयांचा आदर करणारा असता.

दैवी काळात त्या द्रौपदीवर अत्याचार झाले, मध्ययुगीन  काळात देखील अत्याचार झाले आणि आत्तादेखील निर्भया आणि प्रियांका रेड्डी सारखी प्रकरणे घडतच आहेत. मग यातून असे दिसते की प्रशासने आपण निर्माण केली. कायदे, शिक्षा निर्माण झाले पण त्यातून स्त्री हा विषय मात्र सिमापारच राहिला. कारण स्त्रियांवर अत्याचार झाले की न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी ही अधिकच गडद होते आणि एखाद्या स्त्रिला न्याय मिळेपर्यंत ती ह्या जगातच नसते.

एखाद्या स्त्रिवर अत्याचार झाला की लोक मेणबत्त्या लावतात. यापेक्षा जर हातात मशाली घेतलात ना तर असे अत्याचारच होणार नाहीत. यातूनच स्त्रियांना देखील एवढच सांगणे आहे की आपले आदर्श लक्ष्मीबाई, सावित्रीबाई यांसारखे लढाऊ वृत्तीचे बनवा म्हणजेच अन्यायाला घाबरुन पळून जाण्याऐवजी अन्याया विरुद्ध कसून सामना करा. अत्याचार करणाऱ्यांच्या अत्याचारी प्रवृत्तीचा एवढा छळ करा की ही प्रवृत्तीच नाहीशी झाली पाहिजे. तुम्ही देखील एवढं सामर्थ्यशाली बना की तुमच्या सामर्थ्याजवळ ती अत्याचारी प्रवृत्ती येण्याअगोदरच खाक झाली पाहिजे.

आणि तरच स्त्रिवरील अत्याचार कमी होऊन स्त्रीमहिमा आपल्याला कळेल!

‘‘ परस्त्री मातेसमान

ही शिकवण जाणली पाहिजे,

आई, बहिण, काकी, वहिणी

अशी प्रत्येक स्त्री सक्षम बनली पाहिजे’’

# ग्रामीण भागातील शिक्षणाची अवस्था

**कु.शितल दबडे**
तृतीय वर्ष वाणिज्य

शिक्षण ही काळाची गरज आहे. आज कित्येक बालक या शिक्षणापासून वंचित आहेत.शिक्षणाच्या वयात हाताला लागलेले काम, घरातील अपेक्षेचे ओझे, चिमुकल्या वयात मुले या अपेक्षेच्या ओझ्याने पार कोलमडून जातात. आज कित्येक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागातील परिस्थिती एवढी विपरीत आहे की शिक्षण नावाचे अक्षरही त्या आई वडिलांना माहित नसते. अडाणी आई वडिलांना शिक्षणाचे महत्व माहित नसल्याने, त्यांच्या मुलांना शिक्षण देणे त्यांना आवश्यक वाटत नाही. ज्यांना शिक्षणाचे मोल माहित आहे त्या पालकांचे शिक्षणाच्या अवास्तव खर्चापायी मुलांना शिकवायचे स्वप्न स्वप्नच राहून जाते.

एकीकडे शहरीकरण जोमाने वाढत आहे पण आजचा ग्रामीण भागातील शेतकरी, गरीब होतकरु मजूर लोक तेच मागासलेले आयुष्य जगत आहे. आपण गौरवाने म्हणतो आपल्या देशाने खूप प्रगती केली पण आजही का मग आपल्या देशातील शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो? हा मला आणि माझ्या सारख्या अनेक साधारण व्यक्तींना पडलेला प्रश्न आहे. जिथे आपण शिक्षणाचे महत्व सांगत प्रत्येकाला शिक्षण मिळायला हवे, तो त्यांचा संविधानिक अधिकार आहे असे म्हणतो. पण त्या तळागाळातील माणसांची मुलं का त्यांच्या अधिकारापासून वंचित राहतात याचा विचार मात्र कधीच होत नाही किंवा केलाही जात नाही. साधारण घरातील मुले आजच्या वाढत्या पैशाच्या बाजारात शिक्षणासाठी पैसा आणतील तरी कोठून ? घरी एका वेळची भाकर मिळवता मिळवता ज्यांच्या तळ हाताची घावे त्यांच्या कष्टाची करुन गाथा सांगून जातील अशा होतकरु मुलांचे भविष्य मात्र अंधातरीच राहून जाते. आजची शिक्षणाची परिस्थिती एवढी भयाण आहे की साधारण लहान मुलाला बालवाडीत आजच्या भाषेत सांगायचे तर Convent मध्ये जरी टाकायचे असले तर लाखाने एकापेक्षा एक खर्चिक संस्था दिसतील. जेवढी जास्त फी तेवढा जास्त अभिमान असतो. या पैश्याने धनाढ्य असलेल्या पालकांना आणि तेही गौरवाने सांगतात आमच्या मुलाची फी इतकी लाख तितकी लाख भरली म्हणून. हा खर्च तर असतोच पण इतर शैक्षणिक वर्गही कुण्या महागड्या क्लासेसला घालण्यात येतो. जिथे भाकरीच्या शोधात आमचा शेतकरी, मजूर लाकांचे आयुष्य जाते तिथे हा पैसा ते आणणार तरी कोठून ?आजचा ग्रामीण भागातील युवक खूप त्रस्त आहे या साऱ्या बाबींमुळे.

# अनुभव एन.एस.एस. चा

जगलो नव्हतो जीवन

ते एकदा जगायला गेलो होतो

समाजकार्याची जाणीव व्हावी

म्हणून ते करुन बघायला गेलो होतो

तिथे गेल्यानंतर माझ्या मित्रांची

रुपे ही वेगळीच दिसू लागली होती

कारण मित्रांच्या मनावर ही

समाज सेवेची भावना ठसू लागली होती

रुग्णालय साफ करावं म्हणून

आम्ही तेथे देह मन नेलं

एकजूट दाखवून तेथे

आम्ही ते रुग्णालय साफ केलं

गाय विहीरीत पडली अशी एक

नवीन बातमी समोर आली

तेव्हा आमच्या सरांनी

युवकांना एक नवीन प्रेरणा दिली

दहा वर्ष गुडूप झालेल्या वाटेलाही

आम्ही एक नवीन रुप दिलं होतं

एकीचं हेच बळ दाखवून

त्या पाऊलवाटेला आम्ही मुक्त केलं होतं

स्वच्छतेचा मूलमंत्र तर आम्ही
वेळोवेळी देत होतो
पंचायत, देऊळे साफ करुन
तो नारा गगनात नेत होतो

पाणी अडवून पाणी जिरवून
समृद्ध गावाला केलं
पाणी हे जीवन आहे
हे महत्व पटवून लोकांना दिलं

दररोज नवीन व्याख्याने ऐकून
ती ज्ञानाची घागर भरत होती
खचलेल्या मुलांच्या जीवनातील
ती यशाची पाऊलवाट ठरत होती

येताना मी आलो होतो
जाताना आम्ही जात होतो
शरीराने घरी निघालो
पण मनाने मात्र तिथेच रहात होतो

जाताना सारे मित्र
एका छताखाली एकत्र आले
हृदय भरुन आले साऱ्यांचे
नयनातून चटकन अश्रू ही आले
चटकन अश्रू ही आले!

**प्रथमेश आंबेरकर**
व्दितीय वर्ष वाणिज्य

# आपली मैत्री

मित्र आहोत आपण
एकमेकांवर खूप प्रेम करतो
मित्र एखाद्या अडचणीत असेल तर
मदतीचा हात पुढे करतो.

ग्रुप आपला असा आहे की
आपला नादच नाही कोण करणार
करायचंच असेल तर प्रेम करतील
पण मैत्रीला नावं कोणीच नाही ठेवणार

लोकांना मैत्री म्हणजे काय
ते कळायला पाहिजे आपल्याकडे पाहून
आपली आठवणही रोज काढली पाहिजे त्यांनी
एकटं राहून राहून

आपली मैत्री म्हणजे
आपला जीव की प्राण
पण आपल्यासाठी ती खूप मोठी आहे
सोन्याची खाण

जाता जाता एकच सांगेन
ही मैत्री आहे कधीच तोडायची नाय
जगाच्या पाठीवर कुठे ही जाऊ
पण साथ कधी सोडायची नाय

**।।ही दोस्ती तुटायची नाय ।।**

**लाभेश गोमणे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

# जिद्द

ढवळून सारी स्वप्ने माझी
कुठे शोधली खोल तळाशी
दुष्काळाच्या गर्तेमध्ये
राहून गेले एक तळाशी

गढुळलेल्या उण्यापुऱ्या त्या
रोगटलेल्या पाण्यावरती
राहून गेले एक कसे ते
चिकटून होते शेवाळाशी

हाती सोबत चुकचुकणाऱ्या
रातकिड्यांच्या आवाजाची
पिऊन गेले रात काजळी
डगमगले ना परी मुळाशी

कसली जिद्द त्याची म्हणावी
जगण्याची की गुदमरण्याची?
सोयरीक ही जुळवत होते
गरगरणाऱ्या पाचोळ्याशी

इथेच आहे बहर फुलांचा
दिसेल तारा माथ्यावरती
भरेल तेव्हा कळशी माझी
हितगुज चाले आभाळाशी

**प्रसाद नारकर**
व्दितीय वर्ष वाणिज्य

# जीवनाचे सार

जन्माला आला आहेस

थोड जगून बघ

जीवनात दु:ख खूप आहे

थोड सोसून बघ

चिमूटभर दु:खाने कोसळू नकोस

दु:खाचे पहाड चढून बघ

यशाची चव चाखून बघ

अपयश येतं निरखून बघ

डाव मांडणं सोपं असतं

थोडं खेळून बघ

घरटं बांधण सोपं असतं

थोडी मेहनत करुन बघ

जगणं कठीण मरण सोपं असतं

दोन्हीतल्या वेदना झेलून बघ

जीणं मरणं एक कोडं असतं

जाता जाता एवढं सोडवून बघ

**कु. गौरी ठाकूरदेसाई**
द्वितीय वर्ष वाणिज्य

# स्पर्धा

स्पर्धा असो कुठलीही
असावी लागते ती जिद्द
उद्दिष्ट समोर असावे
पण जीत हारची नसावी ह-

स्पर्धा असावी निकोप
फसवी नसावी जिवघेणी
द्वेष, इर्षा, मत्सर, मुक्त
सूडभाव नसावा मनी

आवड पाहून पाल्यांची
क्षेत्र तेच निवडावे
प्रोत्साहन देवून तयांना
त्यांच्या कला कलाने घ्यावे

बंद असो वा खुली स्पर्धा
सामिल व्हा तयात हटकून
स्पर्धेशिवाय प्रगती नाही
भविष्य सुखमय घ्या करुन

**कु. मयुरी रावणक**
तृतीय वर्ष वाणिज्य

# मित्रप्रेम

अनोख्या अशा मित्रांची
ती गोष्टच फार न्यारी
एकत्र मिळून ज्ञानाची
मिळविती ते तिजोरी

आनंद मिळतो मज्जा येते
येते त्या क्षणाला
सहवास त्यांचा लाभता
आनंद होतो मनाला

असता मित्र एकत्र सारे
संकटाचे त्या भय नाही
लढती होऊन एकत्र सारे
एकात्मतेची जाणीव होई

भाग्य माझे मानतो मी
की लाभला त्यांचा सहवास
वाटते की त्या सख्यासमवेत
घ्यावा अखेरचा श्वास

जातात मित्र दूर तेव्हा
उर माझा दाटून येतो
वेडा बनवतो तो दुरावा
नयनी अश्रू लोटून येतो !

**अनिकेत बावकर**
व्दितीय वर्ष वाणिज्य

# मला ही जन्माला येऊ दे !

उदरात  ठेवलीस जपूनी मला
मला ही हे जग पाहू दे
विनवणी करतो आई तुला
मला ही जन्माला येऊ दे

बाबा घेईल खांद्यावर मला
गालावर गोड मुका तो घेईल
बापाची माया काय असते
ही सारी जवळून मी पाहीन

आजी - आजोबा लाड करतील
प्रेमाने जवळ घेतील
आनंदाचे क्षण सारे
जीवनात माझ्या देतील

दादाकडून रक्षणाचे माझ्या
वचन मी घेईन
बहिणीची माया सारी
मी त्याला भरभरुन देईन

तुझ्यासाठी ही आई मी
माझ्या डोळ्यात खूप स्वप्ने साठविली आहेत
वेदनेच्या रुपाने आई ती
उदरातून मी पाठविली आहेत

तुझी माया वात्सल्य तुझे
त्याचा स्पर्श मला होऊ दे
विनवणी करतो आई तुला
मला ही जन्माला येऊ दे!

**कु. सायली गांगण**
व्दितीय वर्ष वाणिज्य

# जग बदल घालुनी घाव

जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।

गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत ।

अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनीवरती धाव । ।

धनवंतांनी अखंड पिळले । धर्माधांनी तसेच छळले ।

मगरीने जणू माणिक गिळिले । चोर जाहले साव । ।

ठरवून आम्हा हीन कलंकित । जन्मोजन्मी करुनी अंकित ।।

जिणे लादुनी वर अवमानित । निर्मून हा भेदभाव ।

एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊनी चल बा पुढती । ।

नव महाराष्ट्र निर्मूनी जगती । करी प्रकट निज नाव । ।

**संकलक**

**कु. मयुरी कोलते**

तृतीय वर्ष कला